Nutan Shikshan Prasark Mandal, Desaiganj's

# ADARSH ARTS AND COMMERCE COLLEGE, DESAIGANJ (WADSA)

Dist- Gadchiroli (Maharshtra) 441207

Affiliated to Gondwana university, Gadchiroli

Re-accredited by NAAC 'B' with 2.15 CGPA

---

# SELF STUDY REPORT

# 2017-18 to 2021-22

---

## CRITERION – III


## RESEARCH, INNOVATIONS & EXTENSION

**METRIC NO.** :- **3.4 Extension Activities**

**METRIC NAME** :- **3.4.1 Outcomes of Extension activities in the neighbourhood community in terms of impact and sensitizing the students to social issues for their holistic development during the last five years.**

## Creating Awareness about CORONA through Social Media through Social media









## Awareness about CORONA vaccination for the citizens between 18 to44 year old citizen







# Online programme for CORONA vaccination for the citizens between 18 to 44




PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli




# देशोन्नती

# तरुणांनो लसीकरण मोहिमेचे अग्रदूत व्हा

## डॉ. अशोक गहाणे यांचे प्रतिपादन

देशोन्नती वृत्तसंकलन...

**देसाईगंज** ▪ कोरोना महामारीने भारतासह जगभर हाहाकार माजला असताना कोरोना पासून आपल्या नागरिकांचे संरक्षण करण्याचा शासन, प्रशासन पूर्ण ताकदीने प्रयत्न करीत आहे.या अभियानाच्या तिसऱ्या टप्प्यात १८ ते ४४ वयोगटातील नागरिकांना लस दिली जात आहे. परंतु या मोहिमेत ग्रामीण भागातील नागरिकांचा अपेक्षित सहभाग व सहकार्य नसल्याने आता समाजात लसीकरण मोहिमेविषयी जनजागृती करण्यासाठी महाविद्यालयीन तरुणांनी पुढाकार घेण्याचे आवाहन वैद्यकीय अधिकारी डॉ.अशोक गहाणे यांनी केले.







स्थानिक आदर्श कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आभासी कार्यशाळेचे मुख्य मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविध्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर कुकरेजा होते.

या महामारीने तिच्या दुसऱ्या लाटेत ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात शिरकाव केला असून अनेक कुटुंब कोरोनाने बाधित झाले आहेत. यामुळे वैद्यकीय यंत्रणेवर मोठा दबाव असून अनेक रुग्णालयांमध्ये कोरोना रुगणांसाठी बेड उपलब्ध होत नाहीत.परिणामी अनेक गरीब नागरिकांचा बळी जात आहे. यातून सुखरूप बचावाचा एकमेव पर्याय म्हणजे लसीकरण होय. तेव्हा या दोन पैकी जी कोणती लस आपल्या नजीकच्या लसीकरण केंद्रामध्ये उपलब्ध असेल ती लस घेऊन समाजातील वरिष्ठ नागरिकांसमोर आदर्श प्रस्थापित करावा असा मौलिक सल्ला डॉ. गहाणे यांनी दिला.

या सत्रात डॉ.गहाणे यांनी कोरोनाची अद्यावत आकडेवारी, गृहविलगिकरणाची प्रक्रिया, लसीकरण मोहीम तसेच लस घेतल्यानंतर निर्माण होणाऱ्या सर्वसाधारण समस्या आणि त्यावर उपाय याविषयी विस्तृत मार्गदर्शन केले. तसेच कोरोनाचा संसर्ग टाळण्यासाठी मास्कचा नियमित वापर, वारंवार हात धुणे व शारीरिक अंतराचे पालन करणे आवश्यक असल्याचे सांगितले आणि विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना समर्पक उत्तरे देऊन त्यांच्या समस्यांचे निराकरण केले.

या आभासी कार्यशाळेचे संचालन, प्रास्ताविक आणि मार्गदर्शकांचा परिचय महाविद्यालया अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा. डॉ. श्रीराम गहाणे यांनी केले तर उपस्थितांचे आभार रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.निहार बोदेले यांनी मानले. झूम वर आयोजित या कार्यशाळेचे नियंत्रण आणि तांत्रिक सहकार्य रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.निलेश हलामी यांनी केले.

दि. १४ मे २०२१ ○ गडचिरोली लाईव्ह ○ पान नं. २

PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

# तरुणांनो लसीकरण मोहिमेचे अग्रदूत व्हा

## डॉ. गहाणे यांचे प्रतिपादन

**वार्ताहर, देसाईगंज.** लसीकरण मोहिमेच्या तिसऱ्या टप्प्यात 18 ते 44 वयोगटातील नागरिकांना लस दिली जात आहे. परंतु या मोहिमेत ग्रामीण भागातील नागरिकांचा अपेक्षित सहभाग व सहकार्य नसल्याने आता समाजात लसीकरण मोहिमेविषयी जनजागृती करण्यासाठी महाविद्यालयीन तरुणांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन वैद्यकीय अधिकारी डॉ. अशोक गहाणे यांनी केले.

स्थानिक आदर्श कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील अंतर्गत गूणवत्ता हमी कक्ष (आयक्युएसी) आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आभासी कार्यशाळेचे मुख्य मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. शंकर कुकरेजा होते. सध्या भारतात कोविशिल्ड आणि कोव्हॅक्सिन या दोन कोरोना प्रतिबंधात्मक लसीचे डोज दिले जात आहेत. या दोन्ही लसी पूर्णपणे सुरक्षित असून त्यांचे कोणतेही दीर्घकालीन दुष्परिणाम होणार नाहीत. याउलट नागरिकांचे कोरोनापासून संरक्षण करण्यासाठी हाच एक प्रभावी उपाय असल्याने या अभियानाला गावखेड्यात यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या युवकांनी प्रशासनाला सहकार्य करावे,




असा मौलिक सल्ला डॉ. गहाणे यांनी दिला. या सत्रात डॉ. गहाणे यांनी कोरोनाची अद्ययावत आकडेवारी, गृहविलगिकरणाची प्रक्रिया, लसीकरण मोहीम तसेच लस घेतल्यानंतर उद्भवणाऱ्या सर्वसाधारण समस्या आणि त्यावर उपाय याविषयी विस्तृत मार्गदर्शन केले. कार्यशाळेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. शंकर कुकरेजा यांनी कार्यशाळेत उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना स्वतःचे आणि परिवारातील पात्र सदस्यांचे तसेच आपल्या गावातील इतर नागरिकांचे लसीकरण करण्यासाठी पुढे येऊन त्यांना ऑनलाईन नोंदणी करण्यासाठी मदत करावी, असे आवाहन केले. कार्यशाळेचे संचालन, प्रास्ताविक आणि मार्गदर्शकांचा परिचय अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा. डॉ. श्रीराम गहाणे यांनी केले. आभार रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. निहार बोदेले यांनी मानले. झूमवर आयोजित या कार्यशाळेचे नियंत्रण आणि तांत्रिक सहकार्य रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. निलेश हलामी यांनी केले.

## CORONA Preventive Vaccination Camp at College





## आदर्श कॉलेजमध्ये ८०% विद्यार्थ्यांचे लसीकरण

**देसाईगंज :** कोविडमुळे वरिष्ठ महाविद्यालये गेल्या १९-२० महिन्यांपासून विद्यार्थ्यांसाठी पूर्णपणे बंद होती. राज्यशासनाने बंद पडलेली महाविद्यालये २० ऑक्टोबरपासून पूर्ववत सुरू करण्याचा निर्णय घेतला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर कुकरेजा यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक आदर्श कला व वाणिज्य महाविद्यालयात मिशन युवा स्वास्थ्य अभियानांतर्गत कोविड-१९ लसीकरण मोहीम राबविण्यात आली. महाविद्यालयात ८० टक्के विद्यार्थ्यांचे कोविड लसीकरण झाले. ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रवीण कोसे व त्यांचे पाच सहकारी कर्मचारी चमुने लसीकरण अभियानाला सहकार्य केले. यात एकूण ३८ विद्यार्थ्यांचे लसीकरण करण्यात आले. यात २६ जण प्रथम लस घेणारे, तर दुसरी लस घेणाऱ्या १२ विद्यार्थ्यांचा समावेश होता. यापूर्वी लसीकरणाबाबत महाविद्यालयाने नमुना सर्वेक्षण केले. यात जवळपास ८० टक्के विद्यार्थ्यांचे लसीकरण झाल्याचे निदर्शनास आले. हे अभियान यशस्वी करण्यासाठी शारीरिक शिक्षण व रासेयो विभाग, तसेच सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

Scanned with CamScanner



<u>**Woman Empowerment Activities**</u>

## Health Awareness Programme









# आरोग्याबाबत मार्गदर्शन

लोकमत न्यूज नेटवर्क

**देसाईगंज :** येथील आदर्श कला व वाणिज्य महाविद्यालयात महिला सबलीकरण विभागाच्या वतीने गुरुवारी प्राध्यापक व कर्मचाऱ्यांसाठी तसेच शुक्रवारी विद्यार्थ्यांकरिता आरोग्याबाबत जागरुकता कार्यशाळा घेण्यात आली.

याप्रसंगी नागपूर येथील तज्ज्ञ औदुंबर बापर्डेकर यांनी सर्वांना आरोग्याबाबत मार्गदर्शन केले. स्त्रियांना मासिक पाळीतील समस्या, नियमिततेचे फायदे यासह विविध बाबींवर माहिती दिली. विविध आजारांना दूर ठेवण्यासाठी आयुर्वेदिक पद्धतीने उपचार करण्याविषयी सांगितले. या कार्यक्रमाला प्राचार्य डॉ.शंकर कुकरेजा, उपप्राचार्य डॉ.एच.एम.कामडी, प्रा.दीपाली मैंद उपस्थित होते. संचालन डॉ.हितेंद्र धोटे तर आभार प्रा.नीलेश हलामी यांनी मानले. यशस्वीतेसाठी शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

# आरोग्याबाबत जागरूकता विषयावर कार्यशाळा



**प्रतिनिधी/देसाईगंज**

आदर्श कला व वाणिज्य महाविद्यालयात देसाईगंज येथे महिला सबलीकरण विभागाच्या वतीने १९ डिसेंबरला महाविद्यालयीन प्राध्यापक वृंद व इतर कर्मचारी करिता २० डिसेंबरला ला महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकरिता 'आरोग्याबाबत जागरूकता' या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

कार्यशाळेचे उद्‌घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर कुकरेजा यांनी केले. मंचावर उपप्राचार्य डॉ. एच. एम. कामडी, प्रा. दिपाली मैंद उपस्थित होते.

कार्यशाळेत युनिमॅक्स इंडिया नागपूरचे तज्ज्ञ व्यक्ती औदुंबर बापर्डेकर यांनी कार्यशाळेला उपस्थित प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांना स्त्रियांच्या मासिक पाळीच्या संदर्भात, मासिक पाळीच्या नियमिततेतील फायदे व मासिक पाळीच्या अनियमिततेमुळे स्त्रियांच्या एकंदरीत आरोग्यावर होणारे दुष्परिणाम यावर विस्तृत मार्गदर्शन केले. या संदर्भातील दुष्परिणामांना शरिरापासुन दुर ठेवण्यासाठी व झाल्यास त्यावर आयुर्वेद पध्दतीने उपचार करण्यासाठी त्यांनी मार्गदर्शन केले.

संचालन डॉ. हितेंद्र धोटे यांनी तर आभार महिला सबलीकरण विभागाचे प्रमुख प्रा. निलेश हलामी यांनी मानले. कार्यशाळेला महाविद्यालयाचे बहुसंख्य विद्यार्थींनी उपस्थित होत्या.

Adarsh Arts & Commerce College Desaiganj

PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

# Self Defence Workshop








PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

# World Woman Day

## World Woman Day 2022




## Workshop on Women Empowerment 2021




Adarsh Arts & Commerce College Desaiganj

PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

## आदर्श महाविद्यालय, देसाईगंज



आदर्श महाविद्यालय देसाईगंज येथे मार्गर्शन करताना मान्यवर.

देसाईगंज : आंतरराष्ट्रीय महिला दिन महिलांच्या हक्कांच्या चळवळीचे प्रतीक असून त्यांच्या हक्कांना प्रोत्साहन देण्याच्या हेतूने हा दिवस पाळला जातो. सर्वत्र समाज उन्नत्ती घडवून आणायची असेल तर शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, प्रशासकीय व आर्थिक क्षेत्रात पुरूषांच्या बरोबरीने महिलांना स्थान मिळाले पाहिजे, असे प्रतिपादन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. डॉ. जयदेव देशमुख यांनी केले. आदर्श महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून बोलत होते. यावेळी मंचावर महिला सक्षमीकरण विभाग प्रमुख प्रा. डॉ. हितेंद्र धोटे, रासेयो प्रमुख निहार बोदेले, प्रा. दीपिका शर्मा उपस्थित होते. पुढे बोलताना ते म्हणाले की, आजही जगात महिला शिक्षण व आरोग्य संदर्भात मागासलेल्या आहेत. अलीकडे महिलांवरील हिंसाचाराच्या घटनाही मोठ्या प्रमाणात घडत आहेत, त्यांना नोकरीमध्ये पदोन्नतीसाठी अनेक बाबींचा सामना करावा लागतो. अशा वेळी महिलांना त्यांच्या अधिकाराविषयी जागृत करणे गरजेचे आहे. यावेळी महिला सक्षमीकरण विभागाचे प्रमुख डॉ. हितेंद्र धोटे यांनीही महिला समानतेवर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. निहार बोदेले यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रा. रमेश धोटे यांनी मानले.

## Workshop on Women Empowerment 2020




Occasion of world women day



# परावलंबित्व दूर करा –नमिता बांगर

**देसाईगंज** : कौटुंबिक व सामाजिक विकासासाठी महिलांचे आर्थिक सबलीकरण काळाची गरज आहे. प्रत्येक कुटुंबातील महिला आर्थिकदृष्ट्या सबल झाल्यास परावलंबित्व दूर होईल व कौटुंबिक सामाजिक विकासही साधतील, असा विश्वास कुरखेडा न.पं.च्या मुख्याधिकारी नमिता बांगर यांनी व्यक्त केला. स्थानिक आदर्श कला व वाणिज्य महाविद्यालयात 'महिलांचे आर्थिक सबलीकरण' या विषयावर आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. शंकर कुकरेजा होते. तर प्रमुख अतिथी म्हणून प्रा.डॉ. अनिता बगमारे, प्रा. दीपाली मैंद उपस्थित होत्या. वेशभूषा स्पर्धेत १५ विद्यार्थिनी सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या प्रास्ताविक प्रा.नीलेश हलामी, संचालन प्रा. किरणापुरे तर आभार प्रा. हेमलता कराडे यांनी मानले. यशस्वीतेसाठी कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

## Environmental Sensitization Activity

## Tree plantation 2020









## Tree plantation and Forest Conservation – Vruksha Dindi 2019







विदर्भ NEWS EXPRESS

Take Your BUSINESS to the NEXT Le



## वृक्ष लागवडीमुळे जिवसृष्टी वाचेल, वृक्ष संवर्धन काळाची गरज : आशिष वांदिले

**विदर्भ न्यूज एक्सप्रेस**

**तालुका प्रतिनिधी / देसाईगंज :** वृक्ष लागवड व संवर्धन ही काळाची गरज असुन जिवसृष्टी वाचविण्यासाठी प्रत्येक व्यक्तीने किमान एक झाड लावुन त्याचे संवर्धन केले पाहिजे असे प्रतिपादन ग्रिन अर्थ ऑर्गनायझेशनचे संयोजक आशिष वांदिले यांनी केले.

देसाईगंज येथील आदर्श महाविद्यालयाच्या प्रांगणात आज २६ जून रोजी वृक्ष दिंडी याञेचे आगमन झाले. या कार्यक्रमात आशिष वांदिले यांचेसह सहकार महर्षी प्रकाश सावकार पोरेड्डीवार, न प अध्यक्षा शालुताई दंडवते, उपाध्यक्ष मोतिलाल कुकरेजा, प्रशांत कांबळे,प्राचार्य शंकर कुकरेजा, जगदिश शर्मा केवळरामजी घोरमोडे,राजेश जेठानी,प्रा,शिंगाडे, सोपाल अग्रवाल, हरगोविंद जोशी, प्रा, दामोधर शिंगाडे,प्रा सुभाष उपाटे,प्रा चावके,प्रा देशमुख, प्रा निहार बोदेले इ, मान्यवर उपस्थित होते, या कार्यक्रमाला संबोधित करतांना आशिष वांदिले म्हणाले की,आज जगात ग्लोबल वॉर्मिंग चे युग सुरु असुन सर्वत्र दुषित वातावरण निर्माण झाले आहे. वाढत्या औद्योगिकरणामुळे बहुतांश झाडंची कत्तल हेत असुन याचा परिणाम पर्यावरणावर झाल्याचे आपणास दिसुन येत आहे. दिवसेंदिवस वाढते तापमान,पर्जन्यमानाची कमतरता याचा थेट परिणाम मानवी जिवनावर होत असुन बदलत्या निसर्ग चक्रामुळे मानवी जिवन संकटात येण्याची चिन्हे निर्माण झाल्याचे चित्र आज आपणास पहावयाला मिळत आहे. या संकटावर उपाय योजना म्हनुण ग्रिन अर्थ फाउंडेश द्वारे गेल्या ४ वर्षापासुन ३३ कोटि वृक्ष लागवडिचे संकल्प पुर्ण करण्याचा मानस बाळगुण ही वृक्ष दिंडी संपुर्ण विदर्भात भ्रमण करत आहे. प्रत्येक व्यक्तिने किमाण एक वृक्ष लावुन त्याचे संवर्धन केल्यास पर्यावरण संतुलित करण्यासह जिवसृष्टी वाचविण्यासही मदत होईल असे प्रतिपादन वांदिले यांनी केले. या कार्यक्रमाला शालेय विद्यार्थी, प्रतिष्ठीत नागरिक शिक्षक वृंद, प्राचार्य मोठ्या संखेने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन प्रा,डॉ, श्रिराम गहाणे यांनी केले.

## Tree plantation 2018



# Tree plantation 2017




# Oath Taking on “Mazi Vasundhara”





# आदर्श महाविद्यालयात माझी वसुंधरा अभियानातंर्गत 'हरीत शपथ'

देशोन्नतीवृत्तसंकलन

**देसाईगंज** ▪ स्थानीक आदर्श महाविद्यालयात 'माझी वसुंधरा' अभियानाअंतर्गत विद्यार्थ्यांना हरीत शपथ देण्यात आली.

निसर्गाशी असलेली कटीबध्दता निश्चीत करण्यासाठी पृथ्वी, वायु, जल, अग्नी आणि आकाश या पंचतत्वावर आधारित उपाययोजना करणे गरजेचे आहे.

म्हणून शाश्वत निसर्गपूरक जीवनपध्दती अवलंबिण्यासाठी 'माझी वसुंधरा' या अभियानाला सुरूवात करण्यात आली. पृथ्वी तत्त्वांशी संबंधीत बाबींवर कार्य, वायू तत्त्वांचे संरक्षण करून हवेच्या गुणवत्तेत सुधारणा करणे, जलस्रोताचे संवर्धन, संरक्षण करणे, उर्जेचा अपव्यय टाळणे इत्यादीकरीता उपाययोजना करून मानव घटक म्हणून शाश्वत निसर्गपूरक जीवनपध्दतीचा अवलंब केला पाहिजे असे मार्गदर्शन निसर्ग मंडळाचे प्रभारी डॉ. दिवाकर कामडी यांनी केले.

महाविद्यालयाच्या सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना त्यांच्या वाढदिवशी पाच झाडे लावून पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी प्राचार्य डॉ. शंकर कुकरेजा यांच्या अध्यक्षतेखाली 'हरीत शपथ' देण्यात आली. यावेळी प्राचार्य डॉ. शंकर कुकरेजा यांनी पर्यावरण-प्रदुषणाविषयी मार्गदर्शन केले.

'माझी वसुंधरा' अभियानातंर्गत 'हरित शपथ' देण्याकरिता एक लिंक तयार करून महाराष्ट्र शासनाच्या डब्लूडब्लूडब्लू.माझीवसुंधरा.ईन या वेब पोर्टला जोडण्यात आली. दिनांक १ ते १५ जानेवारी या कालावधीत ३१२ महाविद्यालयीन विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्रतिज्ञा घेतली. प्रा. निहार बोदेले, प्रा. निलेश हलामी यांनी हे अभियान यशस्वी करण्यासाठी सहकार्य केले.

## College Campus Cleaning







राष्ट्रीय सेवा योजना पथक
2021.12.15 09:56


Vivo V9
Dual Rear Camera


Vivo V9
Dual Rear Camera






# रासेयो दिनानिमित्त केली स्वच्छता


**देसाईगंज :** स्थानिक आदर्श कला व वाणिज्य महाविद्यालयातील रासेय विभागाच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिन 'स्वच्छता हीच सेवा' म्हणू साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी डॉ. जे. पी. देशमूख होते. प्रमुख अतिथ म्हणून रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. निहार बोदेले व प्रा. नीलेश हलाम उपस्थित होते. डॉ. जे. पी. देशमूख यांनी रासेयो स्वयंसेवक हे राष्ट्राच्य विकासाचे समाजातील युवा दुत आहेत. राष्ट्रीय सेवा योजना विभा महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या विविधांगी विकासासोबतच समाज विकास व समाजसुधारणेचे कार्य करते. विद्यार्थ्यांना समाजाशी जोडण्याचे कार्य करते, अर प्रतिपादन केले. रासेयो विभाग प्रमुख प्रा. निहार बोदेले यांनी रासेयो विभाग ह महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमधील विधायक शक्तीला समाजविकास व उन्नतीकरिता वापरण्याचा एक सशक्त माध्यम आहे, असे मार्गदर्शन केले कार्यक्रमानंतर रासेयो स्वयंसेवकांनी महाविद्यालय परिसरात स्वच्छता करू संदेश दिला. कार्यक्रमाचे संचालन स्वयंसेविका चांदणी बन्सोड हिने तर आभा स्वयंसेवक प्रीतम मेश्राम यांनी मानले. यशस्वीतेसाठी स्वयंसेवकांनी सहकार केले.

# Railway Station Cleanliness






# poster Competition on Water Conservation




# Awareness on Cleanliness through Rally and Street Play 2021-22






PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

Adarsh Arts & Commerce College

## Awareness on Cleanliness through Rally and Street Play 2019-20









Adarsh Arts & Commerce College

**PRINCIPAL**
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

# Awareness on Cleanliness through Rally and Street Play 2018-19












**Awareness on Cleanliness through Rally and Street Play 2017-18**




PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli




## Health Awareness




**नवराष्ट्र**

### व्यंजन स्पर्धा थाटात

# आदर्श महाविद्यालयात पोषणयुक्त मेजवाणी

देसाईगंज (वा.) स्थानिक आदर्श कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व गृह अर्थशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने पोषण आहार पंधरवड्या अंतर्गत पोषणयुक्त व्यंजन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यादरम्यान विविध पोषणयुक्त खाद्यपदार्थांची मेजवाणी महाविद्यालयात रंगली होती.



सदर स्पर्धेत महाविद्यालयीन अनेक विद्यार्थी, विद्यार्थीनी उत्स्फूर्तपणे सहभाग दर्शविला. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध पौष्टिक आहाराची मेजवाणी स्पर्धेत सादर केली. कार्यक्रमाचे मुख्य आयोजक प्रा. निहार बोदेले यांनी उपस्थितांना पोषण आहाराचे महत्व व दैनंदिन जीवनामध्ये आपल्या पारंपारिक पदार्थापासून प्राप्त होणारे पोषण याबाबत मार्गदर्शन केले. पोषणयुक्त व्यंजन स्पर्धेचे परीक्षण इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. हितेंद्र धोटे, अर्थशास्त्र विभागाच्या प्रा. की. दिपाली मैंद व इंग्रजी विभागाच्या प्रा. वैशाली बोरकर यांनी केले. परीक्षकांनी विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या विविध पदार्थाची चव घेत त्यांच्या कौशल्याची विशेष स्तुती केली.

### पोषणयुक्त पदार्थांची जागरुकता

पोषणयुक्त व्यंजन स्पर्धेत अनेक विद्यार्थ्यांनी सहभागी होत. पोषणयुक्त स्वादिष्ट अशा पदार्थांच्या माध्यमातून पोषण कसे मिळवता येईल यासाठी विभिन्न पदार्थ बनवून जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न केला. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध पोष्टिक पदार्थ तयार करीत प्रदर्शनी मांडली. परीक्षकांनी विद्यार्थ्यांच्या पदार्थ तयार कौशल्याची प्रशंसा करीत पदार्थांच्या विशेष महत्वून जाणून घेतले.

### पोषक आहाराचे पटले महत्त्व

अलीकडे आहार संस्कृतीत झालेल्या बदलामुळे लहान मुलांपासून वयस्क व्यक्तींपर्यंत पोटभर खाल्ले जाते; मात्र ते पोषणयुक्त असेलच असे नाही. अलीकडे फुटपाथवरील खाद्यपदार्थ खाण्याच्या सवयीमुळे युवकांच्या शारीरिक व मानसिक वाढीसाठी पोषण प्राप्त होत नाही. ही जाणीव महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये व्हावी व कोणते पदार्थ अधिक पोषक आहेत की ज्यामुळे व्यक्तीच्या शारीरिक आणि मानसिक विकासामध्ये महत्त्वाचे ठरतात, याची जाण विद्यार्थ्यांमध्ये व्हावी व सोबतच पाककलेबाबत विद्यार्थ्यांमध्ये आवड निर्माण व्हावी म्हणून या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

Gadchiroli Edition
12 April 2022 Page No. 3
epaper.navarashtra.com

# Sashkt Bhart Abhiyan – 10000 Step Walk







## देसाईगंज येथे जलजागृती

देसाईगंज : स्थानिक आदर्श कला व वाणिज्य महाविद्यालयात जलजागृती सप्ताहनिमित्त मार्गदर्शन कार्यक्रम बुधवारी घेण्यात आला. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एच. एम. कामडी होते. प्रमुख अतिथी म्हणून प्रा. डॉ. एस. जी. गहाणे, विभाग प्रमुख प्रा. रमेश धोटे, प्रा. निहार बोदेले, प्रा. नीलेश हलामी उपस्थित होते. पाणी हे जीवन असल्याने पाण्याचा योग्य वापर करावा. मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड होत असल्याने पावसाचे प्रमाण कमी झाले आहे. त्यामुळे शेती व्यवसायावर परिणाम होत आहे. त्यामुळे पाण्याचा योग्य वापर करावा. पावसाचे पाणी जमिनीत मुरवावे, असे प्रतिपादन डॉ. कामडी यांनी केले. प्रास्ताविक प्रा. धोटे, संचालन प्रा. निहार बोदेले तर आभार प्रा. नीलेश हलामी यांनी मानले. यशस्वीतेसाठी विद्यार्थी व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

Adarsh Arts & Commerce College Desaiganj

PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

## Fit India Campaign




## Constitution Day Programme








नवराष्ट्र

## संविधानाचे जतन प्रत्येकाचे कर्तव्य : डॉ. कामडी

आदर्श महाविद्यालयात महामानवाला अभिवादन

वार्ताहर@देसाईगंज

आपल्याला दिलेले संविधान हे जगातील सर्वात मोठी देणगी आहे. तिचा योग्य अंमल व जतन करणे आपल्या देशवासियांचे कर्तव्य आहे, असे प्रतिपादन डॉ. एच. एम. कामडी यांनी केले.

स्थानिक आदर्श महाविद्यालयाच्या सांस्कृतिक व रासेयो विभागाच्यावतीने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर कुकरेजा यांच्या मार्गदर्शनाखाली व उपप्राचार्य डॉ. एच. एम. कामडी यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. कार्यक्रमाचे संचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. जयदेव देशमुख यांनी तर आभार रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. निहार बोदेले यांनी मानले. कार्यक्रमात प्राध्यापकवृंद, कर्मचाऱ्यांनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून आदरांजली वाहिली.

CARTOON कट्टा

घ्या अशा कठीणप्रसंगी सेवाभाव दाखविण्याऐवजी जास्त पैसा कमावण्याचा मोह नडतो.


Gadchiroli Edition
19 April 2021 Page No. 2
epaper.navarashtra.com




# Voter Awareness





## विद्यार्थ्यांनी घेतली स्वच्छतेची शपथ

देसाईगंज : स्थानिक आदर्श कला व वाणिज्य महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने स्वच्छता पंधरवडा राबविला जात आहे. याअंतर्गत विद्यार्थ्यांनी परिसर स्वच्छ ठेवण्याची शपथ घेतली. स्वच्छता पंधरवड्याचे उद्घाटन प्राचार्य डॉ.एच.एम.कामडी यांच्या हस्ते झाले. स्वच्छता आपल्या जिवनातील अविभाज्य घटक आहे. अस्वच्छतेमुळे होणारे दुष्परिणाम टाळण्यासाठी स्वच्छता पाळावी, असे आवाहन प्राचार्य कामडी यांनी केले. प्रा.निहार बोदेले यांनी विद्यार्थ्यांना स्वच्छतेची शपथ दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचालन प्रा.नीलेश हलामी तर आभार बोदेले यांनी मानले. यशस्वीतेसाठी प्रा.रमेश धोटे, प्रा.डॉ.जे.पी.देशमुख, प्रा.डॉ.राजू चावके, प्रा.डॉ.डी.एन.कामडी, प्रा.डॉ.गहाणे, डॉ.हितेंद्र धोटे व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. महाविद्यालय परिसरात स्वच्छता राबविण्यात आली.






## नवराष्ट्र

**मतजागृती** विविध स्पर्धांचे आयोजन

# जिल्हाभरात राष्ट्रीय मतदारदिन उत्साहात

गडचिरोली ब्युरो. ल्ह्यातील शाळा, हाविद्यालये, शासकीय, मशासकीय कार्यालयात ष्ट्रीय मतदार दिवस 25 निवारी रोजी साजरा रण्यात आला. यावेळी तदान दिवसाची शपथ ण्यात आली.



## जव्हेरी महाविद्यालय, देसाईगंज



**देसाईगंज** . स्थानिक मोहसीनभाई जव्हेरी महाविद्यालयात राष्ट्रीय मतदार दिवसानिमित्ताने कार्यकारी प्राचार्य डॉ. सेलोकर यांच्या मार्गदर्शनाखाली मतदान शपथ कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी महाविद्यालयाची निवडणूक साक्षरता समिती व तहसील कार्यालय देसाईगंजच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांमध्ये मतदानाविषयी जागरुकता निर्माण व्हावी, यासाठी निवडणूक विषयी संबंधित प्रश्नमंजुषा आभासी पद्धतीने आयोजित करण्यात आली होती. प्रश्नमंजुषा कार्यक्रमाच्या आयोजनासाठी नायब तहसीलदार, महाविद्यालयाचे निवडणूक साक्षरता समितीचे नोडल अधिकारी प्रा. सत्यनारायण पुसाला, प्रा. पत्रे, डॉ. कुशाल लांजेवार यांनी योगदान दिल. यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

## आदर्श महाविद्यालय



**देसाईगंज**. स्थानिक आदर्श कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात प्राचार्य डॉ. शंकर कुकरेजा यांच्या अध्यक्षतेखाली निवडणूक साक्षरता मंडळ, राष्ट्रीय सेवा योजना विभाग व तहसील कार्यालयाच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्यात आला. यावेळी निवडणूक साक्षरता मंडळ प्रमुख डॉ. सुभाष उपाते यांनी प्रौढ मतदारांना शपथ दिली. याप्रसंगी प्राचार्य डॉ. शंकर कुकरेजा यांनी मार्गदर्शन केले. यशस्वीतेसाठी प्रा. डॉ. जे. पी. देशमुख, प्रा. डॉ. दिवाकर कामडी, प्रा. डॉ. राजू चावके, नॅक समन्वयक डॉ. श्रीराम गव्हाणे, प्रा. निलेश हलामी, नालंदा राऊत, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी सहकार्य केले. संचालन डॉ. सुभाष उपाते यांनी तर आभार प्रा. डॉ. मिथुन राऊत यांनी मानले.

## जिल्हा परिषद,


## वनश्री महाविद्यालय

# Voter Awareness Programme




# National Unity and Integrity





## मानवी साखळीतून दिला ऐक्याचा संदेश

**देसाईगंज :** स्थानिक आदर्श कला व वाणिज्य महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने सामाजिक ऐक्य पंधरवडा राबविला जात आहे. या अंतर्गत रासेयो स्वयंसेवक व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी वर्तुळाकार मानवी साखळी तयार करून सामाजिक ऐक्याचा संदेश दिला. यावेळी प्राचार्य डॉ. एच. एम. कामडी, रासेयो कार्यक्रम अधिकारी निहार बोदेले, प्रा. नीलेश हलामी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.



## रासेयोकडून व्यसनमुक्तीचा संदेश

देसाईगंज : नववर्षाच्या पर्वावर नव संकल्प घेऊन नवीन वर्षाचे स्वागत अनेकांनी केले. देसाईगंज येथील आदर्श कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने रासेयो स्वयंसेवकांनी पारंपरिक पद्धतीने नववर्ष स्वागत करण्याच्या पध्दतीला फाटा देत नववर्षानिमित्त मानवी शृंखला तयार करून मद्य निषेध चिन्ह साकारून व्यसनमुक्तीचा निर्धार केला. रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. नीलेश हलामी व प्रा. निहार बोदेले यांच्या नेतृत्वात रासेयो स्वयंसेवक व स्वयंसेविकानी सहभागी होत रासेयोच्या समाज विकासाच्या कार्यात योगदान देण्यासाठी पुढाकार घेतला. यावेळी प्राचार्य डॉ. एच. एम. कामडी, उपप्राचार्य प्रा. रमेश धोटे, प्रा. डॉ. हितेंद्र धोटे, प्रा. डॉ. एन कामडी, प्रा. डॉ. एस. जी. गहाने, प्रा. डॉ. राजू चावके, प्रकाश ठाकरे, जाईद शेख उपस्थित होते.

## Use of fire extinguish under Disaster management




PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

# आदर्श महाविद्यालयात अग्निशमनाचे प्रात्यक्षिक

**देसाईगंज, ता. २२ :** अचानक लागलेल्या आगीमुळे जीवितहानी व मालमत्तेचे होणारे मोठे नुकसान टाळण्यासाठी शासकीय, निमशासकीय व खासगी आस्थापनेत अग्निशामक यंत्रणा तयार ठेवणे बंधनकारक केले आहे. त्याचाच भाग म्हणून स्थानिक आदर्श महाविद्यालयात अग्निशमनाचे प्रात्यक्षिक करण्यात आले.

आगीसारख्या आकस्मिक व दुर्दैवी घटनेवर नियंत्रण ठेवण्यासाठी महाविद्यालयात उपलब्ध अग्निशामक साहित्याचा उपयोग सर्व कर्मचाऱ्यांना करता यावा म्हणून या प्रात्यक्षिक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. प्रात्यक्षिक कार्यशाळा प्राचार्य डॉ. शंकर कुकरेजा यांच्या मार्गदर्शनात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आपत्ती व्यवस्थापनाअंतर्गत आयोजित करण्यात आली. यावेळी महाविद्यालयाच्या प्रांगणात आगीला नियंत्रणात आणण्याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले.



**देसाईगंज : अग्निशमनाचे प्रात्यक्षिक दाखवताना कर्मचारी.**



## Workshop on Disaster Management





# आदर्श महाविद्यालयात आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीर संपन्न

## आपत्ती व्यवस्थापनात महाविद्यालयीन युवकांच्या सहभागाने बचाव व पुनर्वसन कार्य सुलभ होते - मनीष समर्थ

**शहर प्रतिनिधी,**
**देसाईगंज, दि. १६ :** नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्ती टाळता यावी, शक्य [illegible] आपत्तीमुळे होणारी जीवितहानी व वित्तहानी न्युनतम राहिल यासाठी शासना सोबतच स्वयंसेवी संघटना, ध्येय वेडे, व समाजशील युवक-युवती यांचा आपत्ती पुर्व, आपत्ती दरम्यान व आपत्ती नंतरच्या कार्यात सहभाग महत्त्वाचा आहे. नैसर्गिक आपत्ती कधीही सांगून येत नाही, मात्र आपत्ती व्यवस्थापनात सहभागी सर्व घटकांच्या बरोबरीने महाविद्यालयीन युवकांच्या सहभागाने आपत्तीचे बचाव व पुर्नवसन कार्य अत्यंत सुलभ रितीने साध्य करता येते. मात्र त्याकरीता महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण घेणे आणि सकारात्मक मानसिकतेने आपत्ती ग्रस्तांच्या मदतीला धावून जाणे आवश्यक आहे' असे विचार वडसा येथील एच.पी.गॅस एजन्सीचे संचालक मनीष समर्थ यांनी उद्घाटक व मुख्य मार्गदर्शक म्हणून व्यक्त केले. ते स्थानिक आदर्श महाविद्यालयात गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली व आदर्श महाविद्यालयातील विद्यार्थी विकास विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीरा प्रसंगी बोलत होते.

या प्रशिक्षण शिबीर प्राचार्य डॉ.शंकर कुकरेजा यांच्या मार्गदर्शनाखाली व अध्यक्षतेखाली पार पडले.

[illegible] आपत्तकालीन व्यवस्थापन, सेफ्टी किलनिक व आग नियंत्रण, प्रथमोपचार बचाव कार्याचे व्यवस्थापन व पुर, आग व रासायनिक दुर्घटना इत्यादी विषयांवर अनुक्रमे डॉ.एच.बी.धोटे, मनिष समर्थ, समादेशक गट १३ विसोरा मासाळ व पंकज डहाणे यांच्या नेतृत्वाखाली व सहा. समादेशक चौधरी व जांभूळकर इत्यादी मान्यवरांनी स्लाईडद्वारे प्रात्यक्षिका सह मार्गदर्शन केले.

शिबिर आयोजनाची भूमिका प्रास्ताविकातून आपत्ती व्यवस्थापन विभाग प्रमुख डॉ.विठ्ठल चव्हाण यांनी मांडली. सूत्रसंचालन प्रा.निहार बोदेले तर आभार डॉ.राजू चावके यांनी मानले. प्रशिक्षण शिबीर यशस्वी करण्यासाठी प्रा.डॉ.डी.एन. कामडी, प्रा. [illegible], प्रा.श्रीकांत परसे, प्रकाश ठाकरे यांनी अथक परिश्रम घेतले. या प्रशिक्षण शिबिरात महाविद्यालयातील १४० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

# World Population Day




# Ek Bharat Shreshtha Bharat Programme




# Pension Week Programme







## आदर्श महाविद्यालयात 'पेन्शन वीक' कार्यक्रम



**देसाईगंज** । स्थानिक आदर्श कला व वाणिज्य महाविद्यालय येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने ३० नोव्हेंबर ते ६ डिसेंबर या कालावधीत देशभरात होवू घातलेल्या 'पेन्शन वीक' कार्यक्रम साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर कुकरेजा यांच्या मार्गदर्शनात महाविद्यालयात 'पेन्शन वीक' साजरा करताना असंघटित क्षेत्राकरिता राबविण्यात येत असलेले 'प्रधानमंत्री कर्मयोगी मानधन पेन्शन योजना' व संघटीत क्षेत्राकरिता राबविण्यात येत असलेले 'राष्ट्रीय पेन्शन योजना' याबाबतची माहिती प्रा. निहार बोदेले व प्रा. निलेश हलामी यांनी विद्यार्थ्यांना दिली. या योजनेसंदर्भात माहितीपट दाखविण्यात आले. तसेच प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन पेन्शन योजनासंदर्भात समाजात जनजागृती करावी याकरिता विद्यार्थ्यांना आवाहन करण्यात आले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, रासेयो स्वयंसेवक व स्वयंसेविका तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# Orientation Programme on Atmanirbhar Bharat







**लोकमत**





## विद्यार्थ्यांना मिळाले आत्मनिर्भरतेचे धडे


**देसाईगंज :** नेहरु युवा केंद्र गडचिरोलीच्या वतीने देसाईगंज येथील आदर्श महाविद्यालयात विद्यार्थ्यांना आत्मनिर्भर बनण्याचे धडे देण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. शंकर कुकरेजा होते. उद्घाटन जिल्हा युवा समन्वय अधिकारी अमित पुंडे यांनी केले. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून केंद्रप्रमुख विजय बन्सोड, प्रा.बडोले, कैवल्य एज्युकेशन फाउंडेशनचे कुणाल गुरनुले उपस्थित होते. याप्रसंगी युवकांना विविध व्यवसायांबाबत माहिती देण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय युवा स्वयंसेविका सपना लाडे, सूत्रसंचालन स्वयंसेवक पंकज लाडे तर आभार सचिन वैद्य यांनी मानले. यशस्वितेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी सहकार्य केले.

Hello Gadchiroli
Page No. 3 Feb 14, 2022
Powered by: erelego.com

## Online Guidance on Role of NSS in National Building




## Online Programme on the occasion of Gandhiji Birth Anniversary






# रासेयो स्वयंसेवकांनी महात्मा गांधीजींच्या ग्रामोन्नती संकल्पनेला वाहून घ्यावे : प्रा. डॉ. राम वासेकर

**देसाईगंज** : जागतिक पातळीवर विकासाच्या चढाओढीत काही देशांबरोबर भारताने आघाडी घेतली असली तरी विकासाची फळे समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचविण्याची मानसिकता पहावयास मिळत नाही म्हणून गावांचा विकास केला पाहिजे. याच अर्थाने गावांचा विकास म्हणजे देशाचा विकास, अशी शिकवण महात्मा गांधीजींनी दिली. सोबत सत्य आणि अहिंसेच्या विचाराची सुद्धा आज पुन्हा एकदा जगाला गरज आहे. रासेयो स्वयंसेवकाने महात्मा गांधीजींच्या विचारांचा स्वीकार करावा व ग्रामोन्नतीसाठी झटावे. महात्मा गांधींना तीच खरी श्रद्धांजली ठरेल, असे विचार प्रा. डॉ. रामचंद्र वासेकर यांनी व्यक्त केले.

आदर्श कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना (रासेयो) विभागाच्या वतीने शनिवापर, २ ऑक्टोबर रोजी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांचा संयुक्त जयंती कार्यक्रम व रासेयो प्रसिद्धी सप्ताहा समारोपानिमित्त आयोजित 'महात्मा गांधींच्या स्वप्नातील भारत आणि आजचा युवक' विषयावर आभासी पद्धतीने आयोजित कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर कुकरेजा यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम घेण्यात आला. अध्यक्षस्थानावरून बोलताना डॉ. कुकरेजा म्हणाले की, देशातील ग्रामीण विकास हा ग्रामीण युवकांच्या हाती असून युवकांनी सकारात्मक वृत्ती जोपासावी. विचारातून शोषणाविरुद्ध लढा द्यावा व ग्रामीण भागाच्या विकासासाठी आवश्यक स्वयंस्फूर्त प्रयत्न करावे, असे आवाहन त्यांन केले. यावेळी डॉ. जयदेव देशमुख यांनीही समायोचित मार्गदर्शन केले. रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.निहार बोदेले यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रम आयोजांच्या भूमिकेवर प्रकाश टाकला. संचालन डॉ. श्रीराम गहाणे यांनी तर आभार डॉ. आर. डी. चावके यांनी मानले.

# International Literacy Day Programme







गडचिरोली विशेष पान नं.४
दिनांक ९ सप्टेंबर २०२०

## आदर्श महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय साक्षरतादिन

देसाईगंज : स्थानिक आदर्श महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय साक्षरतादिन राष्ट्रीय सेवा योजना, सांस्कृतिक व प्रौढ शिक्षण विभागाच्या वतीने ऑनलाइन गुगल मिट ॲपवर आयोजित करण्यात आला. यावेळी अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. शंकर कुकरेजा तर प्रमुख अतिथी डॉ. एच. एम. कामडी, डॉ. जयदेव देशमुख आदी उपस्थित होते. याप्रसंगी मान्यवरांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन व प्रास्ताविक प्रा. निहार बोदेले तर आभार प्रा. निलेश हलामी यांनी मानले. यावेळी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

Adarsh Arts & Commerce College, Desaiganj

PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

# आदर्श कॉलेजमध्ये साक्षरता दिन साजरा

लोकमत न्यूज नेटवर्क

**देसाईगंज :** येथील आदर्श महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना, सांस्कृतिक व प्रौढ शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ऑनलाईन आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन मंगळवारी साजरा करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ. शंकर कुकरेजा यांनी साक्षरता ही देशाच्या विकासासाठी आवश्यक आहे. रोजगार, स्वयंरोजगार व कौशल्य विकास निर्माण करणाऱ्या दर्जेदार शिक्षण व प्रशिक्षण संस्थांच्या माध्यमातून साक्षरतेला बळ मिळते, असे प्रतिपादन केले. डॉ. एच. एम. कामडी यांनी समाजातील जुन्या रुढी, परंपरा सांगितल्या. यावेळी डॉ. जयदेव देशमुख, प्रा. निहार बोदेले, प्रा. नीलेश हलामी व कर्मचारी हजर होते.







# AIDS Awareness Programme









## वडसात रॅलीतून एड्सबाबत जनजागृती

**देसाईगंज :** स्थानिक आदर्श कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने शहरातील मुख्य मार्ग तसेच बाजारपेठेतून रॅली काढून एड्सबाबत जनजागृती करण्यात आली. प्राचार्य डॉ. कुकरेजा यांच्या मार्गदर्शनात प्रा. निहार बोदेले व प्रा. निलेश हलामी यांच्या नेतृत्त्वात रॅली काढण्यात आली. रासेयो स्वयंसेवकांनी एड्सविषयीचे विविध घोषवाक्याचे फलक हातात घेऊन तसेच घोषणा देत एड्सबाबत लोकांना जागृत केले. त्यानंतर प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यशस्वीतेसाठी प्रा. डॉ. हितेंद्र धोटे, डॉ. उपाते, डॉ. चव्हाण, डॉ. डी. एन. कामडी, प्रा. अनिता घोडमारे, प्रा. राखी शर्मा आदींनी सहकार्य केले.


राष्ट्रीय सेवा योजना विभाग
एड्स सप्ताह





राष्ट्रीय सेवा योजना विभाग
एड्स सप्ताह



## रासेयो पथकाकडून रॅलीद्वारे एड्स जनजागृती

देसाईगंज : स्थानिक आदर्श कला व वाणिज्य महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने जागतिक एड्स दिन सप्ताह दरम्यान शहरातील मुख्य मार्ग व चौकातून रॅली काढण्यात आली.यात एड्स निर्मूलनसंबंधी घोषणा देण्यात आल्या. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एच. एम. कामडी यांनी विद्यार्थ्यांना एड्सबाबत मार्गदर्शन केले. रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. निहार बोदेले व प्रा निलेश हलामी यांच्या नेतृत्वाखाली रॅली काढण्यात आली. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापकवृंद, रासेयो स्वयंसेवक व स्वयंसेविका तसेच विद्यार्थी या रॅलीत सहभागी झाले.

## National Youth Day Programme







PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli